नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे Year - 2nd | अंक - १८५ Issue - 185 | वार शुक्रवार दि. २२ नोव्हेंबर २०२४ Blow- Friday Date 22 November 2024 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## अदाणींचे शेअर कोसळले, दोन लाख कोटी पाण्यात

### लाचखोरीच्या ठपक्याने शेअर बाजारात खळबळ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : अदाणी समूहाचे अध्यक्ष गौतम अदाणी यांच्यावर दोन हजार कोटी रुपयांची लाच दिल्याचा आरोप अमेरिकेतील न्यूयॉर्क येथील सरकारी वकिलांनी केला. यानंतर याचे पडसाद भारतीय शेअर बाजारात उमटले असून शेअर बाजाराचे निर्देशांक सेन्सेक्स आणि निफ्टीमध्ये मोठी घसरण पाहायला मिळत आहे. तसेच अदाणी समूहाच्या शेअरमध्ये जवळपास २० टक्क्यांची घसरण झालेली पाहायला मिळत आहे. गौतम अदाणी आणि त्यांचा पुतण्या सागर अदाणी यांच्यासह इतर सात जणांनी सौर ऊर्जा वितरीत करण्याचे कंत्राट मिळविण्यासाठी भारतातील सरकारी अधिकाऱ्यांना २,०२९ कोटी रुपयांची (२६५ दशलक्ष डॉलर्स) लाच देऊ केली. ज्यामुळे अमेरिकेतील गुंतवणूकदारांचे नुकसान झाले, असा आरोप त्यांच्यावर ठेवला गेला आहे. पहाटे आलेल्या या बातमीचे पडसाद बाजार उघडताच त्यावर दिसून आले.



अदाणी समूहाची प्रमुख कंपनी असलेल्या अदाणी एंटरप्राईजेसच्या शेअरमध्ये २० टक्क्यांची घसरण दिसली. तर अदाणी एनर्जी सोल्यूशनही लाल रंगात रंगले. अदाणी ग्रीन एनर्जी कंपनीला कंत्राट मिळविण्याबद्दल लाच दिल्याचा आरोप ठेवला गेला. या कंपनीच्या शेअरमध्ये १९.१७ टक्क्यांची घसरण झालेली पाहायला मिळाली. अदाणी टोटल गॅस १८.१४ टक्के, अदाणी पॉवर १७.७९ टक्के आणि अदाणी पोर्ट्समध्ये १५ टक्क्यांची घसरण पाहायला मिळाली.

याशिवाय अंबुजा सिमेंट्सच्या शेअरमध्ये १४.९९ टक्के तर एसीसी शेअरमध्ये १४.५४ टक्क्यांची घसरण झाली. अदाणी यांची समूह कंपनी असलेल्या एनडीटीव्हीच्या शेअरमध्येही १४.३७ टक्क्यांची घसरण झाली. तर अदाणी विल्मारमध्ये १० टक्क्यांची घसरण झाली.

आज सकाळी अदाणी समूहातील तीन प्रमुख कंपन्यांचे शेअर जवळपास २० टक्क्यांनी खाली आल्यामुळे एकूणच अदाणीच्या ११ शेअरवरही परिणाम दिसून आला. अदाणी समूहाचे बाजारमूल्य २ लाख कोटींनी घटले. जानेवारी २०२३ मध्ये हिंडेनबर्ग अहवाल प्रसिद्ध झाल्यानंतर अदाणी समूहाची ही आतापर्यंतची सर्वात वाईट कामगिरी असल्याचे बोलले जात आहे.

## अदाणी समूहानं जारी केलं अमेरिकेतील आरोपांवर निवेदन; भ्रष्टाचार प्रकरणाबाबत मांडली भूमिका!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : मुंबई शेअर बाजारात आज व्यवहारांची सुरुवातच मोठ्या आर्थिक भूकंपानं झाली. तिकडे अमेरिकेत गौतम अदाणींवर भ्रष्टाचाराचे आरोप झाले आणि इकडे मुंबईत शेअर बाजार गडगडला. आरोप झालेली रक्कम थोडीथोडकी नसून तब्बल २ हजार कोटींपेक्षा जास्त आहे. त्यामुळे भारतात गुंतवणूकदारांचे पहिल्या तासाभरात अडीच लाख कोटींहून जास्त नुकसान झालं. त्यापाठोपाठ भारताच्या राजकीय वर्तुळात या मुद्द्यावरून प्रतिक्रिया उमटू लागल्या. विरोधी पक्षांनी अदाणींवर टीका करतानाच भारतीय जनता पक्षाला लक्ष्य केलं. राहुल गांधींनी यावरून पंतप्रधान नरेंद्र मोदींवर जाहीररीत्या टीका केली. या प्रकरणावर आता अदाणी समूहाकडून निवेदन जारी करण्यात आलं आहे.

अदाणी समूहाकडून जारी करण्यात आलेल्या स्पष्टीकरणाच्या निवेदनात भ्रष्टाचाराच्या सर्व आरोपांचं खंडन करण्यात आलं आहे. अमेरिकेच्या विधी विभागाकडून ‘अदाणी ग्रीन्स’च्या संचालकांवर करण्यात आलेले सर्व आरोप निराधार असून आम्ही ते सर्व आरोप फेटाळत आहोत, असं या निवेदनात सुरुवातीलाच नमूद करण्यात आलं आहे.

अमेरिकेच्या विधी विभागानंच नमूद केल्याप्रमाणे अशा प्रकारच्या प्रकरणांमध्ये दाखल करण्यात आलेले गुन्हे तोपर्यंत फक्त आरोप ठरतात, जोपर्यंत ते सिद्ध होत नाहीत. तोपर्यंत संबंधित आरोपी हा निर्दोषच असतो. या प्रकरणात आम्ही शक्य त्या सर्व कायदेशीर बाबींची विचार करत आहोत, असंही या निवेदनात अदाणी समूहाकडून सांगण्यात आलं आहे.




**अदाणी समूह कायद्यांना बांधील**

दरम्यान, अदाणी समूह कायद्याचं पालन करण्यासाठी बांधील असल्याचं निवेदनात म्हटलं आहे. अदाणी समूह कायमच व्यवस्थापनाच्या सर्वोच्च तत्त्वांचं पालन करत आला आहे. त्याशिवाय, कारभारात पारदर्शकता आणि कंपनीच्या सर्वच विभागात नियमांचं पालन या बाबी अदाणी समूहासाठी महत्त्वाच्या आहेत. आम्ही आमच्या भागधारकांना, भागीदारांना आणि कर्मचाऱ्यांना हा विश्वास देऊ इच्छितो की अदाणी समूह हा एक कायद्याचं पालन करणारा समूह असून सर्व कायद्यांचा आदर राखतो, असंही निवेदनाच्या शेवटी लिहिलं आहे.

अदाणी समूहाचे सर्वेसर्वा गौतम अदाणी यांच्यावर अमेरिकेच्या विधि विभागाकडून भ्रष्टाचार केल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यासंदर्भात अदाणींवर गुन्हादेखील दाखल करण्यात आला आहे. खुद्द गौतम अदाणी व त्यांचा पुतण्या सागर अदाणी यांच्यासह एकूण सात जणांचा यात समावेश असल्याचा हा आरोप आहे. या सगळ्यांनी मिळून सौर ऊर्जा वितरणाचं कंत्राट मिळवण्यासाठी काही सरकारी अधिकाऱ्यांना २ हजार ०१९ कोटी रूपयांची (२६५ दशलक्ष डॉलर्स) लाच देऊ केली. अदाणी व अदाणी ग्रीन एनर्जीमधील कार्यकारी अधिकारी विनीत जैन यांनी हा सगळा प्रकार कर्जदार व गुंतवणूकदारांपासून लपवून ठेवला व त्यातून ३ अब्ज डॉलरपेक्षा अधिक कर्ज व राखे गोळा केले, असे आरोप त्यांच्यावर ठेवण्यात आले आहेत.

## थोडक्यात

### निवडणूक कर्तव्यावर असताना पालिका कर्मचाऱ्याचा मृत्यू

मुंबई : निवडणूक कर्तव्यावर असताना पालिकेच्या एका कर्मचाऱ्याचा मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. हा कर्मचारी अंधेरी पूर्व विधानसभा मतदारसंघात कर्तव्यावर होता. आदल्या दिवशी मतदान केंद्रात दाखल झाल्यानंतर त्याला अस्वस्थ वाटू लागले. उपचारासाठी त्याला रुग्णालयात दाखल केले असता त्याचा मृत्यू झाल्याचे घोषित करण्यात आले.

वांद्रे, सांताक्रूझचा भाग असलेल्या एच पश्चिम विभागातील घनकचरा व्यवस्थापन विभागातील कर्मचारी अनिल सातपुते यांना निवडणुकीसाठी अंधेरी पूर्व विधानसभा मतदारसंघात जबाबदारी देण्यात आली होती. मतदानाच्या आदल्या दिवशी अंधेरी पूर्व येथील सर्वपल्ली राधाकृष्णन शाळेत त्यांना मतदान केंद्रावर बोलावण्यात आले होते. मतदान केंद्रावर असतानाच त्यांना अस्वस्थ वाटू लागले. त्यावेळी त्यांना जोगेश्वरीच्या ट्रामा केअर सेंटरमध्ये दाखल करण्यात आले. मात्र त्यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. त्यांचा मृत्यू नक्की कशामुळे झाला याबाबतचा वैद्यकीय अहवाल अद्याप आलेला नाही.

## राज्य मंडळाकडून बारावी, दहावीच्या परीक्षेचे अंतिम वेळापत्रक जाहीर



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे (राज्य मंडळ) घेण्यात येणाऱ्या बारावी आणि दहावीच्या परीक्षेचे अंतिम वेळापत्रक प्रसिद्ध करण्यात आले आहे. त्यानुसार बारावीची लेखी परीक्षा ११ फेब्रुवारी ते १८ मार्च या कालावधीत, तर दहावीची लेखी परीक्षा २१ फेब्रुवारी ते १७ मार्च या कालावधीत घेतली जाणार असून, दरवर्षीच्या तुलनेत यंदा सुमारे आठ ते दहा दिवस परीक्षा लवकर होत असल्याचे स्पष्ट झाले आहे.

राज्य मंडळाचे सचिव देविदास कुल्हाळ यांनी प्रसिद्धिपत्रकाद्वारे अंतिम वेळापत्रकाबाबतची माहिती दिली. राज्य मंडळाच्या वेळापत्रकानुसार बारावीची प्रात्यक्षिक, अंतर्गत मूल्यमापन, तोंडी परीक्षा २४ जानेवारी ते १० फेब्रुवारी या कालावधीत, तर दहावीची प्रात्यक्षिक, अंतर्गत मूल्यमापन, तोंडी परीक्षा ३ ते २० फेब्रुवारी या कालावधीत होणार आहे. परीक्षेचे विषयनिहाय सविस्तर वेळापत्रक २१ नोव्हेंबरपासून राज्य मंडळाच्या http://www.mahasscboard.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून दिले जाणार आहे. मंडळाच्या संकेतस्थळावरील वेळापत्रकाची सुविधा ही केवळ माहितीसाठी आहे. परीक्षेपूर्वी माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालयांकडे छापील स्वरुपात देण्यात येणारे वेळापत्रक अंतिम असेल. त्या छापील वेळापत्रकावरूनच विद्यार्थ्यांनी परीक्षेच्या तारखांची खात्री करून परीक्षा द्यावी. अन्य संकेतस्थळांवरील किंवा यंत्रणेने छपाई केलेले, व्हॉट्सअॅप किंवा तत्सम माध्यमातून प्रसिद्ध झालेले वेळापत्रक ग्राह्य धरू नये, असेही स्पष्ट करण्यात आले.

दरवर्षी बारावीची परीक्षा फेब्रुवारीच्या तिसऱ्या आठवड्यात, दहावीची परीक्षा मार्चच्या पहिल्या आठवड्यात सुरू होते. त्यानंतर निकाल मे-जूनमध्ये जाहीर केला जातो. या दरम्यान विविध प्रवेश परीक्षा होतात. तसेच नियमित परीक्षेतील अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठीची पुरवणी परीक्षा जुलै ऑगस्टमध्ये होते. या सर्व प्रक्रियेत जाणारा वेळ, विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी वेळ मिळणे, प्रवेश प्रक्रिया लवकर पूर्ण होण्याच्या दृष्टीने राज्य मंडळाने यंदा बारावी-दहावीच्या परीक्षा आठ ते दहा दिवस लवकर घेण्याचा निर्णय घेतला होता. त्यानुसार अंतिम वेळापत्रक तयार करण्यात आले आहे.

## १७५ जागांसह राज्यात नवे सरकार स्थापन होणार; नवा एक्झिट पोल जाहीर झाला

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील विक्रमी मतदानानंतर सर्वांच्या नजरा या २३ तारखेच्या निकालाकडे लागल्या आहेत. अशात मतदानानंतर समोर आलेल्या विविध एक्झिट पोलमध्ये महायुतीला बहुमत मिळेल असा अंदाज वर्तवण्यात आलाय. काल अनेक संस्थांनी त्यांचे अंदाज वर्तवले होते. मात्र २०१४च्या लोकसभा निवडणुकीचा अचूक अंदाज वर्तवणारे टुडेस चाणक्य मतदान झाल्यानंतर दुसऱ्या दिवशी आपले अंदाज जाहीर केले आहेत.

चाणक्यच्या एक्झिट पोलनुसार राज्यात पुन्हा एकदा महायुतीचे सरकार येऊ शकते. या एक्झिट पोलनुसार भाजपच्या नेतृत्वाखालील महायुतीला १७५ जागा मिळतील असा अंदाज आहे. या अंदाजात ११ जागा कमी जास्त होऊ शकतात. तर महाविकास आघाडीला १०० (११ जागा कमी जास्त) जागा मिळतील. अन्यला १३ जागा (५ जागा कमी जास्त) मिळण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.



मतांच्या टक्केवारीचा विचार केल्यास महायुतीला ४५ टक्के, महाविकास आघाडीला ३९ टक्के तर अन्यला १६ टक्के मते मिळण्याची शक्यता चाणक्यने व्यक्त केली आहे.

पोल्स ऑफ पोलनुसार राज्यात महायुतीला १५५ जागा मिळतील. म्हणजे राज्यात पुन्हा एकदा महायुतीचे सरकार येण्याची शक्यता आहे. तर महाविकास आघाडीला १२२ जागांवर समाधान मानावे लागले. २८८ पैकी ११ जागा या अन्यला मिळतील असा पोल्स ऑफ पोलचा अंदाज आहे.

अन्य सर्व संस्थांनी एक्झिट पोल कालच म्हणजे मतदान झाल्यानंतर जाहीर केले होते. चाणक्यने मात्र महाराष्ट्राचे एक्झिट पोल आज जाहीर केले आहेत.

आता २३ तारखेला एक्झिट पोल बरोबर येतात की लोकसभा निवडणूक २०२४ आणि हरियाणा विधासभा निवडणुकीप्रमाणे पुन्हा त्यांचे अंदाज चुकणार हे स्पष्ट होईल. राज्यातील अनेक मतदारसंघात यावेळी विक्रमी मतदान झाले आहे. त्यामुळे हे मतदान सत्ताधाऱ्यांना फायद्याचे ठरणार की त्यांची विकेट पडणार याबाबत विविध अंदाज बांधले जात आहेत. काहींच्या अंदाजानुसार महाविकास आघाडी किंवा महायुती या दोघांनाही बहुमत मिळणार नाही आणि अपक्ष तसेच बंडखोर यांच्या हातात सत्तेच्या चाव्या असतील.

**राज्यात सरासरी ६६ टक्के मतदान** — **मतदानात पाच टक्के वाढ**

## तीन दशकानंतर राज्यात मतदानाची वाढली टक्केवारी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : विधानसभा निवडणुकीत राज्यात सरासरी ६६ टक्के मतदान झाले आहे. गतवेळच्या तुलनेत यंदा पाच टक्क्यांची वाढ झाली आहे. तीन दशकानंतर राज्यात मतदानाची टक्केवारी वाढली आहे. त्यामुळे आता वाढलेली मते नेमकी कुणाच्या पारड्यात गेली आणि याचा फायदा महायुतीला होणार की महाविकास आघाडीला, याची उत्कंठा आहे.



सहा महिन्यांपूर्वी झालेल्या लोकसभा निवडणुकीत राज्यात ६१.२९ टक्के मतदान झाले होते. २०१९ मध्ये विधानसभा निवडणुकीतही राज्यात मतदानाची टक्केवारी ६१.१ होती. या दोन्हीच्या तुलनेत यावेळी पाच टक्क्यांची वाढ झाली आहे. राज्यात सर्वाधिक ७६.२५ टक्के मतदान हे कोल्हापूर जिल्ह्यात झाले आहे. त्याखालोखाल ७५.२६ टक्के मतदान गडचिरोली जिल्ह्यात झाले आहे. सर्वात कमी ५२.०७ टक्के मतदान हे मुंबई शहर जिल्ह्यात झाले आहे. निवडणूक आयोगाने दिलेल्या ताज्या आकडेवारीनुसार नगर (७१.७३), बुलढाणा (७०.६०टक्के), चंद्रपूर (७१.२७टक्के), हिंगोली (७१.१०टक्के), जालना (७२.५३टक्के), नंदुरबार (७०.५१टक्के), परभणी (७०.३८ टक्के), सांगली (७१.८९ टक्के), सातारा (७१.७१ टक्के), यवतमाळ (७०.८६ टक्के) या दहा जिल्ह्यांनी सात दशकी टक्केवारी गाठली आहे. मुंबईतील कुलाबा (४४.४४ टक्के) हा सर्वांत कमी मतदान झालेला मतदारसंघ ठरला आहे. मुंबई उपनगर जिल्ह्यात ५५.७७ टक्के तर ठाणे जिल्ह्यात ५६.०५ टक्के मतदान झाले आहे. १९९५ मध्ये राज्यात शिवसेना-भाजप युतीचे सरकार सत्तेत आले तेव्हा ७१ टक्के मतदान झाले होते. त्यानंतर सर्वाधिक मतदान हे या वेळी झाले आहे.

## ब्रेक-अप झाल्यास पुरुषावर बलात्काराचा गुन्हा दाखल होऊ शकत नाही, सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : पुरुष आणि महिलेचे प्रेमसंबंध सहमतीने असतील आणि त्यानंतर या दोघांचं ब्रेक अप झालं तर पुरुषावर बलात्काराचा गुन्हा दाखल केला जाऊ शकत नाही. प्रेमसंबंध आहेत, लग्न झालं नाही, तर ब्रेक अप झालं म्हणून पुरुषावर गुन्हा दाखल करता येणार नाही असं एका प्रकरणावर निकाल देताना सर्वोच्च न्यायालयाने म्हटलं आहे. एका महिलेने तिच्या प्रियकराने लग्नाचं वचन देऊन वारंवार बलात्कार केला अशी तक्रार दिली होती हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात होतं त्या प्रकरणात हा निकाल सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे.



न्यायमूर्ती बी.व्ही. नागरत्ना आणि न्यायमूर्ती एन. कोटिश्वर यांच्या खंडपीठाने एक महत्त्वाचा निकाल दिला आहे. त्यांनी सांगितलं ज्या नात्यात सहमतीने प्रेमसंबंध ठेवण्यात आले आहेत, शारिरीक संबंध प्रस्थापित झाले आहेत अशा नात्यांमध्ये ब्रेक अप झालं म्हणजेच ते नातं तुटलं म्हणून पुरुषावर बलात्कार किंवा लैंगिक शोषणाचा गुन्हा दाखल होणार नाही. अशा प्रकरणांना कुठल्याही प्रकारचा गुन्ह्याचा रंग देता येणार नाही.

(पान ३ वर....)

## संपादकीय....

# त्रिशंकू परिस्थिती

महाराष्ट्र विधानसभेसाठी बुधवारी (२० नोव्हेंबर) मतदान पार पडले. १५८ राजकीय पक्ष आणि अपक्ष असे मिळून २८८ विधानसभा मतदारसंघांत एकूण ४,१३६ उमेदवार निवडणुकीच्या मैदानात उतरले आहेत. मात्र, खरी लढत ही महायुती विरुद्ध महाविकास आघाडी अशीच आहे. दोन्ही आघाड्यांमध्ये प्रत्येकी तीन प्रमुख घटक पक्ष आहेत. दरम्यान, या निवडणुकीच्या निकालानंतर सरकार कुणाचं येईल हे ओघाने समोर येईलच. तत्पूर्वी मतदानानंतर निवडणुकीच्या निकालाबाबतचे एक्झिट पोल जाहीर झाले आहेत. राज्यात जे १० प्रमुख एक्झिट पोल जाहीर झाले त्यापैकी सहा पोल्समध्ये राज्यात महायुतीला बहुमत मिळेल असा अंदाज वर्तवण्यात आला आहे. तर तीन पोल्समध्ये महाविकास आघाडीला सत्ता मिळेल असा दावा करण्यात आला आहे. एका पोलनुसार राज्यात त्रिशंकू स्थिती निर्माण होऊ शकते. दरम्यान, या एक्झिट पोल्सवर वेगवेगळ्या राजकीय प्रतिक्रिया येऊ लागल्या आहेत. तसेच बहुमताच्या जवळपास पोहोचल्यास सत्ता कशी मिळवता येईल याबाबत सर्वच पक्षांनी चाचपणी सुरू केली आहे. त्यामध्ये काही एक्झिट पोलच्या अंदाजानुसार महायुतीला जास्त जागा मिळण्याची शक्यता आहे, तर महाविकास आघाडीला कमी जागा मिळण्याचा अंदाज आहे. मात्र, असं असलं तरी निकाल समोर आल्यानंतरच कोणाला किती जागा मिळतात? हे स्पष्ट होईल. दरम्यान, विधानसभा निवडणुकीच्या निकालाला एक दिवस बाकी असतानाच मुंबईत मोठ्या घडामोडी वाढल्या असल्याचं पाहायला मिळत आहे. आज सायंकाळी शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत, काँग्रसचे नेते बाळासाहेब थोरात, काँग्रसचे नेते सतेज पाटील आणि राष्ट्रवादी काँग्रस (शरद पवार) पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांची मुंबईतील ग्रँड हयात हॉटेलमध्ये महत्वाची बैठक पार पडली. या बैठकीत निकालानंतर किती जागा येतात? आणि त्यानंतरची पुढील रणनीती काय असेल? याबाबत चर्चा झाल्याची माहिती सांगितली जात आहे. एवढंच नाही तर या बैठकीनंतर जयंत पाटील, बाळासाहेब थोरात आणि संजय राऊत यांनी मातोश्रीवर उद्धव ठाकरे यांच्याबरोबरही चर्चा केली. दरम्यान यावर शिवसेनेचे (शिंदे) प्रवक्ते व आमदार संजय शिरसाट यांनी भाष्य केलं आहे. मला खात्री आहे की राज्यात महायुतीचं बहुमताचं सरकार येईल. परंतु, सत्तास्थापनेसाठी दोन-चार आमदारांची गरज पडली तर अपक्ष आमदार आम्हाला सहकार्य करतील. आम्ही अपक्ष आमदारांचं सहकार्य घेऊन सत्तास्थापन करू, असे म्हटले आहे. त्यामुळे मुंबईत नेमकं काय घडतंय? याकडे अनेकांच्या नजरा लागलेल्या आहेत.

# संविधानावर कोणीही ताशेरे ओढू नये

प्रत्येकाला न्याय मिळवून देण्याचा अधिकार भारतीय संविधानात आहे. भारतीय संविधान सशक्त अशी प्रणाली आहे. त्या संविधानात राजकीय सहिंता, संरचना, कार्यपद्धती, अधिकार, मार्गदर्शक तत्वे, नागरीकांची कर्तव्ये यांचा समावेश आहे. हे संविधान लिहिण्याचे श्रेय डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांना जाते. कारण त्यांनी अपार मेहनत करुन भारतीय संविधान लिहिलं. त्यातच थोडंसं श्रेय त्यांची पत्नी सविता आंबेडकर हिलाही जाते. तिनंही त्या काळात त्यांची प्रकृती सांभाळली. तसंच ती ते जी तत्वं मांडत होते संसदेत, त्यावर आपलं मतही सांगत होती बाबासाहेबांना. हे विसरता येत नाही.

भारतीय संविधान हे २६ नोव्हेंबर १९४९ ला बनले व ते २६ जानेवारी १९५० ला लागू झाले. ते सव्वीस जानेवारीला लागू झाले, म्हणून तो दिवस प्रजासत्ताक दिन म्हणून साजरा केला जातो.

या संविधानाची रचना अशी की या संविधानानुसार शासन एका माणसाच्या हाती केंद्रीत नाही. पुर्वी या राज्याचा कारभार एकाच व्यक्तीच्या हाती कार्यान्वीत होता. राजा हाच कायदा करीत होता. तोच कायदा राबवत होता आणि त्याची अंमलबजावणी न झाल्यास तोच न्यायदान करीत होता. परंतू आता संविधानानुसार कायदेमंडळ वेगळं आहे. कार्यकारीमंडळ वेगळं आहे आणि न्यायमंडळही वेगळंच आहे. कायद्याला सर्व संसदेतील लोकसभेत निवडून आलेले प्रतिनिधी, राज्यसभेत निवडून आलेले प्रतिनिधी व शेवटी राष्ट्रपती यांच्या नजरेखालून जावं लागतं. त्यानंतर त्याची अंमलबजावणी पंतप्रधान व त्याचं कॅबीनेट मंडळ करीत असतं व एखाद्या नागरीकांच्या हातून एखाद्या विषयावर चूक झालीच तर न्यायमंडळ वेगळं असतं. त्यानुसार ज्याचेवर अन्याय झाला. त्याला न्यायालयात दाद मांगता येते.

पुर्वीची पद्धत म्हणजे कायदा एकाच व्यक्तीच्या हाती असल्यानं व्यक्तीवर एखाद्या वेळी अन्याय झाल्यास तो अन्याय ऐकून घेण्याची पद्धत नव्हती. त्यावर योग्य असा न्यायही मिळत नसे. राजा हाच सर्वात मोठा न्यायाधीश होता. तो थेट त्याच्या मनाला वाटेल तर तो मृत्यूदंड ठोठावीत असे. ती हुकूम शाहीच होती. परंतू त्या काळात राजा हाच सर्वोच्च शासक असल्यानं राज्यात गुन्हे जास्त घडत असत. तसं आज नाही. आज प्रत्येक व्यक्तीला अन्याय झाल्यास दाद मागण्याचा अधिकार असल्यानं गुन्हेगार हा निर्भयी झाला आहे. त्याला माहीत आहे की मी गुन्हा केलाही, तरी मला काही शिक्षा होणार नाही. मी माझ्याजवळ असलेल्या पैशानं मोठ्यात मोठा वकील उभा करुन व साक्षीदाराचे मन पालटवून स्वतः न्यायालयीन कचाट्यातून मुक्त होवू शकतो. अशीच काहीशी परिस्थिती आहे आज. आज राजाही बदलवता येत असतो आपल्याला. तोही काही शाश्वत नसतो.

आपल्याला घटनादुरुस्ती करता येते. एखादा कायदा काळानुसार नको असेल तर. कारण आपली राज्यघटना ही परीवर्तनशील आहे. परीदृढ नाही, जी अमेरीकेची आहे. तशीच एकदम जास्तही परीवर्तनीय नाही. आतापर्यंत आपण एकुण १०५ वेळाच घटनादुरुस्ती केलेली असून शेवटची घटनादुरुस्ती १५ ऑगष्ट २०२१ ला केलेली आहे. संविधानसभेचे २८४ सदस्य कायदे बनवतांना त्यांचं मतदान घेतलं जातं.

भारतीय संविधानानुसार देशात एखाद्या वेळी आणीबाणीची परिस्थिती निर्माण झाल्यास त्या ठिकाणी आणीबाणी लावता येते. तेथे राष्ट्रपती शासन असतं. तसेच देशात कारभार चालविण्यासाठी देशातील एकुण भुभागाचे सीमेनुसार व सरहद्दीनुसार काही भाग पाडले आहेत. त्या त्या भागाचा कारभार पाहण्यासाठी वेगळी व्यवस्था निर्माण केली आहे. तेथील कारभार पाहण्यासाठी मुख्यमंत्री व राज्यपाल असतो. तेथेही न्यायपालिका असते. तसेच तेथेही मुख्यमंत्र्यांचं कॅबिनेट मंडळ असतं. एकंदरीत सांगायचं झाल्यास भारतीय घटनेनुसार देशाला स्थैर्य प्राप्त झालं आहे.

भारतीय संविधानानुसार देशातील विवीध भागात कोणालाही आता जागा विकत घेता येते. कोणाला कुठेही राहता येते. मग तो कोणत्याही प्रदेशाचा असो, त्याची भाषा कोणतीही असो, त्याचा पोशाख कोणताही असो, एवढंच नाही तर जात, धर्म, पंथ कोणताही असो. पर्यायानं सांगायचं झाल्यास इथं भाषेनुसार, पोशाखानुसार, जातीनुसार, पंथानुसार व धर्मानुसार कोणताही भेद केलेला नाही. आज भारतातीलच नाही तर विदेशातीलही व्यक्ती कोणत्याही भागात राहू शकतो. विदेशातील लोकं जर सोडले तर भारतातील लोकांना कुठेही राहण्यासाठी वा निवास करण्यासाठी बंधन नाही. बंधन एकच आहे, ते म्हणजे त्यानं शांततेनं राहावं. कोणतेही गुन्हे करु नये. विदेशातील लोकांना व्हिसा लागतो.

महत्वाचं सांगायचं म्हणजे भारतीय संविधान हे सशक्त आहे. चांगलं आहे. परंतू त्यात एकच दोष आहे. त्याला दोष म्हणता येणार नाही. तो दोष म्हणजे येथील न्यायपालिकेनुसार लागणारा खटल्याचा विलंब. शिवाय या देशातील संविधानात ही ताकद आजच्या घडीला दिसत नाही की जी ताकद गुन्हेगारी थांबवेल. आज गुन्हा करणारा घटक हा सशक्त असून तो पैशाच्या जोरावर मोठ्यात मोठा वकील लावून गुन्हा त्यानं केलेला असेल तर आपल्यावर कसा कलंक लावला गेला हे सिद्ध करतो. त्यानुसार वकीलांचेही दर ठरलेले आहेत. सरकारी वकील सशक्ततेनं लढत नाही. कधीकधी तो विकला जात असतो. त्यातच तारीख पर तारीख करीत खटल्याला विलंब लागतो. न्याय मिळत नाही. यामध्ये जर सरकारी वकील हुशार असेल तर न्याय मिळतो आणि तो हुशार नसेल आणि प्रतिपक्ष वकीलावर भारी पडत नसेल तर त्याला न्याय मिळत नाही.

आजचा काळ पाहता केवळ प्रतिपक्ष वकीलांच्या बचावपक्षाला वाचविण्याच्या भुमिकेमुळे भारतीय संविधानावर ताशेरे ओढले जात आहे. आज न्यायीक दृष्टीकोणातून विचार केल्यास गरीबांना कोणीच वाली उरलेला नाही. तसं चित्र अगदी स्पष्ट दिसत आहे. कारण समजा एखाद्या गरीबावर जर अन्याय झाला तर ती केस सर्रासपणे दाबली जाते. सर्वात प्रथम तिथंच दाबली जाते, जिथून सुरुवात होते. सुरुवात ही पोलीस स्टेशनपासून होते.

राजकीय सहभाग व पैशाच्या माध्यमातून काही गरीबांवर झालेले अन्याय व अन्यायकारक प्रकरणं हे खालच्या स्तरावर दडपली जातात. यापैकी एखादं प्रकरण समजा न्यायालयात गेलंच तर ते वकीलांच्या माध्यमातून दाबली जातात. त्यात तारीखवर तारीख करीत करीत जसा खटल्याला विलंब लागतो. तसा जाण्यायेण्याच्या चिंतेनं व जाण्यायेण्याला पैसा लागत असल्यानं गरीब व्यक्ती चिंताग्रस्त होतो व तो खटल्यावर हजेरी दाखवत नाही. कारण तो व्यक्ती दिवसभर जेव्हा कामाला जात असतो. तेव्हाच त्याच्या घरची चूल पेटत असते. यातूनच ती केस अपयशी ठरते व तो गरीब व्यक्ती खटला हारतो.

भाारतीय संविधान याच ठिकाणी हारते. याच ठिकाणी हत्या होते त्याची. यावर एकच उपाय आहे जर संविधानाला सशक्त बनवायचं असेल तर. तो उपाय म्हणजे न्याय आपल्या दारी. न्याय आपल्या दारी याचा अर्थ ज्याचेवर अन्याय झाला. ज्या ठिकाणी अन्याय झाला. त्या ठिकाणी न्यायमंडळानं जावं. चौकशी करावी व ज्या ठिकाणी गुन्हा घडला, तिथंच आरोपीला सर्वांसमक्ष दंडीत करावे वा दंड करावे. जेणेकरुन त्या अपमानानं तरी गुन्हेगार गुन्हे करणार नाही व गुन्ह्यांची संख्या वाढणार नाही. संविधानही सशक्त बनेल व संविधानावर कोणीही ताशेरे ओढणार नाहीत. हे तेवढंच खरं आहे.

**– अंकुश शिंगाडे नागपूर**

# गौतम अदानींच्या अटकेची मागणी, अमेरिकेत खटले दाखल झाल्यानंतर विरोधक आक्रमक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : सुमारे १२ गिगावॉट सौरउर्जेच्या खरेदीसाठी बिगरभाजप सरकारांमधील अधिकाऱ्यांना सुमारे दोन हजार कोटींच्या लाच दिल्याप्रकरणी अदानी समूह वादात सापडला आहे. समूहाचे प्रमुख गौतम अदानी व इतरांवर अमेरिकेमध्ये गुन्हा दाखल झाल्यावरून गुरुवारी काँग्रेस आणि भाजप या दोन्ही राष्ट्रीय पक्षांमध्ये रणकंदन माजले. 'पंतप्रधान नरेंद्र मोदी अदानी यांना संरक्षण देण्याचा प्रयत्न करत असून अदानी यांना तातडीने अटक केली पाहिजे', अशी मागणी लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केली. तर भाजपचे प्रवक्ता संबित पात्रा, आयटी विभागाचे प्रमुख अमित मालवीय यांनी या आरोपांचे खंडन करताना काँग्रेसवर हल्लाबोल केला.

२०२०-२४ या काळात अदानी समूहाने ओदिशा (तत्कालीन सरकार बीजू जनता दल), तामीळनाडू (सरकार-द्रमुक), छत्तीसगढ (तत्कालीन सरकार काँग्रेस), आंध्र प्रदेश ( तत्कालीन सरकार वायएसआर काँग्रेस) आणि जम्मू-काश्मीर (तत्कालीन राष्ट्रपती राजवट) या राज्यांतील सरकारी अधिकाऱ्यांना २६५ दशलक्ष डॉलर म्हणजे सुमारे २ हजार कोटी रुपयांची लाच दिल्याचा आरोप अमेरिकेतील विधि विभागाने केला आहे. आरोपपत्रात नावे असलेल्या सर्व राज्यांमध्ये भाजपेतर पक्षांची सरकारे होती. 'विरोधी पक्षांची सत्ता असलेल्या राज्यांमध्ये लाचखोरी झाली असेल तरीही त्याची चौकशी केली पाहिजे. मात्र या प्रकरणी चौकशीची सुरुवात अदानी यांना अटक केल्यानंतरच होऊ शकते', असे राहुल गांधी यांनी गुरुवारी पत्रकार परिषदेत म्हटले. चार दिवसांनंतर, सोमवारी संसदेचे हिवाळी अधिवेशन सुरू होणार असून सभागृहांमध्ये हा मुद्दा उपस्थित केला जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. अदानी समूहाने भारतीय नव्हे तर अमेरिकेतील कायद्यांचेही उल्लंघन केले आहे. या समूहाभोवतीचे सर्व हितसंबंध काँग्रेस उघडकीस आणेल, असा दावाही राहुल गांधींनी केला.

राहुल गांधींनी थेट मोदींना लक्ष्य केल्यामुळे भाजपने तीव्र प्रतिवाद करत विरोधी पक्षांची सरकारे असलेल्या राज्यांकडे अंगुलीनिर्देश केला. भाजपचे प्रवक्ता संबित पात्रा



यांनी राहुल गांधींच्या दाव्यांची खिल्ली उडवली. २०१९ मध्ये राफेल खरेदी व्यवहारामध्ये लाचखोरी झाल्याचा आरोप केला होता. करोना काळातही पत्रकार परिषदांमधून मोठमोठे दावे केले गेले. पण, नंतर न्यायालयात राहुल गांधींना माफी मागावी लागली होती, असे पात्रा म्हणाले. तर अमित मालविय यांनी या आरोपांच्या वेळेबाबत प्रश्न उपस्थित केला. संसदेचे अधिवेशन तोंडावर आले असताना आणि अमेरिकेत डोनाल्ड ट्रम्प लवकरच अध्यक्ष होणार असताना आताच हे आरोप का केले जात आहेत, असे ते म्हणाले. काँग्रेस ही जॉर्ज सोरोस यांची हस्तक असल्याप्रमाणे वागत असल्याचा आरोपही मालवीय यांनी केला. अदानी समूहाचे आर्थिक घोटाळे बाहेर येत असताना गौतम अदानींना अजूनही अटक केली जात नाही, कारण मोदी अदानींचा बचाव करत आहेत. हिंडेनबर्ग प्रकरणी 'सेबी'च्या प्रमुख माधबी पुरी-बुच यांनी निष्पक्ष चौकशी केली नाहीच, उलट त्याच अदानींच्या संरक्षक झाल्या आहेत. त्याबाबतची वस्तुस्थिती काँग्रेसने लोकांसमोर आणली आहे.

लाचखोरीच्या वादात सापडलेल्या राज्यांमध्ये विरोधी पक्षांची सरकारे होती. भाजपची सत्ता असलेल्या एकाही राज्यातील अधिकाऱ्याला लाच देण्यात आलेली नाही. लाचखोरी प्रकरणाचा संबंध अप्रत्यक्षपणे मोदींशी जोडून मोदींची प्रतिमा मलिन करण्याचा प्रयत्न राहुल गांधी करत आहेत. अमेरिकेची बाजार नियामक 'एसईसी'ने स्वतंत्रपणे, गौतम अदानी आणि त्यांचे पुतणे सागर अदानी आणि अझूर पॉवरच्या अधिकाऱ्यांवर न्यूयॉर्क जिल्हा न्यायालयात खटला दाखल केला आहे. त्यांच्यासह, इतर पाच जणांवर अमेरिकेच्या लाचलुचपत प्रतिबंधक कायदा अर्थात 'फॉरेन करप्ट प्रॅक्टिसेस ॲक्ट (एफसीपीए)'च्या उल्लंघनाचा आणि कट रचल्याचा आरोप आहे. न्यूयॉर्कमधील इतर चार जणांवर न्यायात अडथळा आणण्यासाठी कट रचल्याचा आरोप आहे.

एसईसीचा दावा हा की, अदानी ग्रीन एनर्जीने सप्टेंबर २०२१ मध्ये राखे जारी करून अमेरिकेत ७५ कोटी डॉलर (सुमारे ६,३०० कोटी रुपये) उभारले. अमेरिकी गुंतवणूकदारांचा हा पैसा लाचखोरी आणि फसवणूक करून भारतातील राज्यांचे वीज पुरवठ्याचे कंत्राट पटकावण्यासाठी केला गेला. अमेरिकी गुंतवणूकदारांची ही दिशाभूल आणि फसवणूक तेथील नियामकांच्या दृष्टीने दोषपात्र आहे.

शिवाय एसईसीच्या आरोपपत्रात न्यूयॉर्क शेअर बाजारात सूचिबद्ध अझूर पॉवरचे नाव देखील आहे, जिने ४,००० मेगावॉटच्या सौर विजेच्या पुरवठ्यासाठी निविदा पटकावली आहे. पण ती पटकावण्यासाठी राज्यांना दिलेल्या लाचेचा भार अदानींनी उचलला आणि त्या बदल्यात अझूरला त्यांनी पटकावलेल्या कराराचा काही भाग सोडण्यास लावला गेला, जो नंतर अदानी समूहाने हस्तगत केला.

अदानी समूहाच्या शेअर बाजारातील गैरव्यवहारासंदर्भात अमेरिकेतील रिसर्च कंपनी 'हिंडेनबर्ग'ने दोन वेगवेगळे अहवाल प्रसिद्ध केल्यानंतर देशभर गदारोळ माजला होता. त्यावेळीही काँग्रेससह विरोधी पक्षांनी या आर्थिक गैरव्यवहारांची संयुक्त संसदीय समितीद्वारे (जेपीसी) चौकशी करण्याची मागणी केली होती. अदानी समूहाविरोधातील नव्या आरोपानंतर गुरुवारी पुन्हा काँग्रेस व विरोधी पक्षांनी 'जेपीसी' स्थापन करण्याची मागणी केली. केवळ अदानी समूहच नव्हे, तर 'सेबी'सह अन्य संस्थांच्या कारभाराचीही जेपीसीमार्फत चौकशी केली पाहिजे, असे काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जून खरगे यांनी म्हटले आहे. तर अदानींवर नव्याने झालेल्या आरोपांबाबत मोदी यांनी स्पष्टीकरण दिले पाहिजे, अशी मागणी तृणमूल काँग्रेसने केली आहे. माकपनेही अदानींची सीबीआयमार्फत चौकशी केली पाहिजे, अशी प्रतिक्रिया व्यक्त केली आहे.

# केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी घेतली कोमपल्ली प्रभूदास कुटुंबियांची सांत्वनपर भेट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

हैद्राबाद/ मुंबई : रिपब्लिकन पक्षाचे तेलंगणाचे ज्येष्ठ नेते कोमपल्ली प्रभुदास यांना पुत्रशोक झाल्यामुळे रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय राज्यमंत्री ना. रामदास आठवले यांनी आज त्यांची सांत्वन पर भेट घेतली. तेलंगणातील सिद्धीपेठ जिल्ह्यातील जक्कापूर या गावातील कोमपल्ली प्रभुदास यांच्या निवासस्थानी केंद्रीय राज्यमंत्री ना.रामदास आठवले यांनी भेट देऊन शोकाकुल प्रभुदास कुटुंबीयांचे सांत्वन केले. कोमपल्ली प्रभुदास यांचे सुपुत्र कुमार सागर याचे वयाच्या २३ व्या वर्षी अपघाती दुःखद निधन झाले. त्यामुळे संपूर्ण जक्कापुर गावात शोककळा पसरली होती. कोमपल्ली प्रभुदास यांनी रिपब्लिकन चळवळीसाठी स्वतःला वाहून घेतले आहे. तेलंगानातील रिपब्लिकन



पक्षाचे संघटन वाढवण्यास त्यांचे मोठे योगदान आहे. रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय कार्यकारणी सदस्य म्हणून कोमपल्ली प्रभुदास यांची निवड झालेली आहे. तेलंगणमध्ये रिपब्लिकन चळवळ वाढवण्यात प्रभुदास यांचा मोलाचा वाटा आहे. स्वतःच्या कुटुंबाकडे दुर्लक्ष करून रिपब्लिकन संघटनेकडे कडे अधिक लक्ष दिले असल्याने त्यांना झालेल्या पुत्रशोकामुळे रिपब्लिकन पक्षात ही

## दिवंगत सागर कोमपल्ली यांना वाहिली श्रद्धांजली

दुःख हळहळ व्यक्त होत आहे. केंद्रीय राज्यमंत्री ना.रामदास आठवले यांनी आज त्यांच्या व्यस्त दिनक्रमातून वेळात वेळ काढून मुंबईहून हैदराबाद गाठले. हैदराबाद मधून तेलंगणातील सिद्धीपेठ या जिल्ह्यातील जक्कापूर या गावात जाऊन कोमपल्ली प्रभुदास यांच्या कुटुंबीयांची सांत्वन पर भेट घेतली. यावेळी रिपब्लिकन पक्षाचे आंध्र प्रदेश अध्यक्ष ब्रह्मानंद रेड्डी ; तेलंगणाचे निरीक्षक ज्येष्ठ नेते परम शिवा नागेश्वर गौड; रिपाइं चे तेलंगणा राज्याध्यक्ष रविकुमार पसूला आणि रिपब्लिकन पक्षाचे ख्रिश्चन नेते जॉन मॉस्को; रत्नप्रसाद ;महिला नेत्या स्नेहलता; रोजारानी आदि अनेक रिपब्लिकन पक्षाचे नेते उपस्थित होते.

या वेळी दिवंगत सागर कोमपल्ली यांना श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी जाहीर शोकसभा घेण्यात आली. त्यात ना. रामदास आठवले यांनी दिवंगत सागर कोमपल्ली यांना रिपब्लिकन पक्षातर्फे भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली.या जक्कपुर गावातील सरपंच; पंचायत आणि जिल्हा परिषद सदस्य आदी अनेक मान्यवर उपस्थित होते.

# मतदान संपताच अपक्षांचा भाव वधारला, महायुतीकडून जुळवाजुळव सुरू?

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महाराष्ट्र विधानसभेसाठी बुधवारी (२० नोव्हेंबर) मतदान पार पडले. १५८ राजकीय पक्ष आणि अपक्ष असे मिळून २८८ विधानसभा मतदारसंघांत एकूण ४,१३६ उमेदवार निवडणुकीच्या मैदानात उतरले आहेत. मात्र, खरी लढत ही महायुती विरुद्ध महाविकास आघाडी अशीच आहे. दोन्ही आघाड्यांमध्ये प्रत्येकी तीन प्रमुख घटक पक्ष आहेत. दरम्यान, या निवडणुकीच्या निकालानंतर सरकार कुणाचं येईल हे ओघाने समोर येईलच. तत्पूर्वी मतदानानंतर निवडणुकीच्या निकालाबाबतचे एक्झिट पोल जाहीर झाले आहेत. राज्यात जे १० प्रमुख एक्झिट पोल जाहीर झाले त्यापैकी सहा पोल्समध्ये राज्यात महायुतीला बहुमत मिळेल असा अंदाज वर्तवण्यात आला आहे. तर तीन पोल्समध्ये महाविकास आघाडीला सत्ता मिळेल असा दावा करण्यात आला आहे. एका पोलनुसार राज्यात त्रिशंकू स्थिती निर्माण होऊ शकते. दरम्यान, या एक्झिट पोल्सवर वेगवेगळ्या राजकीय प्रतिक्रिया येऊ लागल्या आहेत. तसेच बहुमताच्या जवळपास पोहोचल्यास सत्ता कशी मिळवता येईल याबाबत सर्वच पक्षांनी चाचपणी सुरू केली आहे. यावर शिवसेनेचे (शिंदे) प्रवक्ते व आमदार संजय शिरसाट यांनी भाष्य केलं आहे. संजय शिरसाट म्हणाले, मला पूर्ण खात्री आहे की राज्यात महायुतीचीच सत्ता येईल. दरम्यान, अनेक एक्झिट पोल्सच्या आकडेवारीनुसार सत्तास्थापनेत अपक्ष आमदारांची भूमिका देखील महत्त्वाची असेल असं दिसतंय. याबाबत संजय शिरसाट यांना प्रश्न विचारल्यावर ते म्हणाले, कोणत्याही निवडणुकीनंतर राज्यात २० ते ३० अपक्ष आमदार असतातच. या अपक्षांपैकी बहुसंख्य नेते हे वेगवेगळ्या पक्षांमधील बंडखोर असतात. कोणलाही बहुमत मिळालं नाही तर अपक्षांची गरज भासते. कोणताही पक्ष बहुमताच्या जवळ गेल्यावर अपक्ष आमदार त्या पक्षाच्या बाजूने आपला कल झुकवतात. ते आमदार तातडीने बहुमताजवळ पोहोचलेल्या पक्षाशी किंवा आघाडीशी संलग्न होतात. मला खात्री आहे की राज्यात महायुतीचं बहुमताचं सरकार येईल. परंतु, सत्तास्थापनेसाठी दोन-चार आमदारांची गरज पडली तर अपक्ष आमदार आम्हाला सहकार्य करतील. आम्ही अपक्ष आमदारांचं सहकार्य घेऊन सत्तास्थापन करू. संजय शिरसाट टीव्ही९ मराठीशी बातचीत करत होते.

दरम्यान, संजय शिरसाट यांना विचारण्यात आलं की तुम्ही (शिवसेनेने) एक्झिट पोल्सचा अंदाज घेऊन आत्तापासूनच अपक्षांची जुळवाजुळव करण्यास सुरुवात केली आहे का? यावर संजय शिरसाट म्हणाले, राजकीय पक्ष व त्यांचे प्रमुख नेते अशा प्रकारची जुळवाजुळव करतच असतात. एकंदरित किती अपक्ष आमदार आहेत? कोणत्या पक्षाची काय परिस्तिती आहे? कोण बहुमताच्या आसपास पोहोचलंय? याचा विचार करून पक्ष व त्यांचे प्रमुख नेते अपक्ष आमदारांशी संपर्क साधतात हे नाकारून चालणार नाही. मात्र काही अपक्ष आमच्या संपर्कात आधीपासूनच आहेत. संजय शिरसाट म्हणाले, एक गोष्ट मी इथे नमूद करेन की एक्झिट पोल पाहून सगळे अंदाज बांधले जात नाहीत. अपक्ष आमच्या बाजूने असले किवा नसले तरी २३ नोव्हेंबर रोजी आमच्या बाजूनेच निकाल लागेल आणि आम्ही राज्यात बहुमताचं सरकार स्थापन करू. तुम्हाला राज्यात महायुतीची सत्ता दिसेल.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

## थोडक्यात...

### ३८१-वागदरी मतदान केंद्रात ६३ टक्के मतदान शांततेत

वागदरी(एस.के.गायकवाड) :

धाराशिव जिल्ह्यातील तुळजापूर विधानसभा मतदारसंघातील ३८१-वागदरी केंद्रात (ता. तुळजापूर) ६३ टक्के मतदान झाले असून मतदान प्रक्रिया अत्यंत शांततेत पार पडली आहे. दि.२० नोव्हेंबर २०२४ रोजी तुळजापूर तालुक्यातील बुथ क्रमांक ३८१ वागदरी येथे सकाळी ठिक ७.०० वा. मतदानाला सुरुवात करण्यात आली.सकाळी ठिक ११ ते १२ वाजण्याच्या दरम्यान जवळपास दिड ते दोनशे मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावून शेतीच्या आपापल्या कामासाठी गेले होते.या मतदार केंद्रावर महिलां मोठ्या प्रमाणात उस्फुर्त पणे मतदानाचा हक्क बजावताना दिसून आल्या.या मतदार केंद्रात एकूण मतदारांची संख्या १०१६ असून त्या पैकी एकूण ६४२ मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला.त्या मध्ये ३१५ पुरूष मतदारांनी तर ३२७ महिला मतदारांनी मतदान केले.असे मिळून १०१६ पैकी ६४२ मतदारांनी मतदान केले असून मतदानाची टक्के या केंद्रात ६३ टक्के होते.शेवट पर्यंत मतदान शांततेत आणि खेळीमेळीच्या वातावरणात पार पडले.

# पंढरपूर विधानसभेसाठी १४ टेबलवर मतमोजणी

## मतमोजणीसाठी २१५ कर्मचारी; १३७ पोलीस अधिकारी कर्मचारी नियुक्त : निवडणूक निर्णय अधिकारी सचिन इथापे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर विधानसभा निवडणुकीची मतमोजणी २३ नोव्हेंबर रोजी सकाळी ८.०० वाजता सुरू होणार आहे. यासाठी १४ टेबलवरुन २५ फेऱ्यात मतमोजणी होणार आहे. याकरीता प्रशासनाने आवश्यक ती तयारी पूर्ण केली आहे. मतमोजणीसाठी सुमारे २१५ अधिकारी कर्मचारी तर सुरक्षेसाठी १३७ पोलीस अधिकारी कर्मचारी नियुक्त करण्यात आले असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी सचिन इथापे यांनी दिली.

पंढरपूर विधानसभा मतदारसंघात एकूण २ लाख ५९ हजार ७४४ मतदारांनी मतदान केलेले असून, मतदारसंघाची मतमोजणी दि. २३ नोव्हेंबर रोजी शासकीय धान्य गोदाम, रेल्वे मैदान समोर, कराड रोड पंढरपूर येथे होणार आहे. मतमोजणीसाठी १४ टेबल ची संख्या आहे. तर २५ फेऱ्यांतून मतमोजणी पूर्ण होणार आहे. एका टेबलवर एक मतमोजणी पर्यवेक्षक, एक मतमोजणी सहाय्यक, एक शिपाई व एक सूक्ष्म निरीक्षक राहणार आहे. तसेच मतमोजणी कक्षात मतमोजणी अधिकारी, कर्मचारी, निवडणूक निर्णय अधिकारी, निरीक्षक, उमेदवार व निवडणूक मतमोजणी प्रतिनिधी यांच्यासाठी बसण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. मतमोजणीकक्षात पुरेसा वीज पुरवठा व जनरेटर बॅकअप, सीसीटीव्ही यंत्रणा आदी सुविधा असणार आहे. संपूर्ण सुरक्षा व्यवस्थेसह आग प्रतिबंधक सुविधा, स्वच्छतागृह, प्राथमिक वैद्यकीय सेवा असणार आहेत.

मतमोजणी केंद्रात निवडणूक निर्णय अधिकारी यांनी दिलेल्या अधिकृत पासधारकांसह मतमोजणीसाठी नियुक्त केलेले

**२५ फेऱ्यांतून मतमोजणी होणार पूर्ण**

अधिकारी, कर्मचारी तसेच मोजणी प्रतिनिधी यांनाच प्रवेश दिला जाईल. मतमोजणी कक्षात मोबाईल तसेच आक्षेपार्ह वस्तू नेता येणार नाहीत. तसेच स्वतंत्र माध्यम कक्ष स्थापन करण्यात आला असून त्याद्वारे माध्यम प्रतिनिधींपर्यंत माहिती पोहोचवली जाणार आहे. सुरक्षा व गोपनियतेच्या दृष्टीने विशेष खबरदारी घेण्यात आली आहे. मतमोजणीच्या वेळी राजकीय कार्यकर्ते, मतमोजणी प्रतिनिधी यांनी शांतता राखून सहकार्य करावे, असे आवाहनही निवडणूक निर्णय अधिकारी सचिन इथापे यांनी केले आहे.

मतमोजणी कक्षात सुरक्षेसाठी पुरेसा पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. यामध्ये १२ पोलीस अधिकारी, १२५ ठाणे अंमलदार याशिवाय केंद्रीय सुरक्षा बल, एस.आर.पी.एफ. यांची सुरक्षा राहणार आहे. मतमोजणी केंद्रासह



मतमोजणी परिसरात चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. निवडणूक निकालानंतर नागरिकांनी शांतता राखून कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी सहकार्य करावे. असे आवाहन उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. अर्जुन भोसले यांनी केले आहे.



### मलकप्पा नंदे यांचे निधन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : वागदरी (ता.अक्कलकोट) येथील मलकप्पा पिरप्पा नंदे (वय ७८)यांचे वृध्दापकाळाने गुरुवारी निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, सुना, नांतवंडे पणतवंडे असा परिवार आहे. गांवगाथा चे संपादक पत्रकार धोंडप्पा नंदे यांचे ते वडिल होत.

# विधानसभा मतमोजणी अनुषंगाने प्रतिबंधक आदेश व वाहतुक नियोजन आदेश जारी : पोलीस निरीक्षक विश्वजीत घोडके

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : २५२ पंढरपुर विधानसभा मतदार संघ मतमोजणी प्रक्रिया दि. २३/११/२०२४ रोजी सकाळी ०८.०० वा. पासुन शासकिय गोडावुन, कराड रोड, पंचायत समिती कार्यालय समोर पंढरपुर येथे सुरू होणार आहे. याबाबतचे आदेश सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार सचिन लंगोटे यांनी जारी केली असून, नागरिकांनी तसेच वाहनधारकांनी निवडणुकीच्या अनुषंगाने पोलीस प्रशासनास सहकार्य करावे असे आवाहन पोलीस निरीक्षक विश्वजीत घोडके यांनी केले आहे.

या अनुषंगाने पंढरपुर शहरात भारत निवडणुक आयोग यांचेकडील सुचनांनुसार मतमोजणी ठिकाणच्या भोवतालीचा परिसर (झशवर्शीीळरप नेपश) केवळ पादचारी परिसर घोषीत करणे आवश्यक असल्याने, मा. तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी पंढरपुर यांनी १. मतमोजणीच्या



ठिकाणाच्या समोरील कराड रोड वर नवीन कराड नाका ते एसडीपीओ कॉर्नर, २. मतमोजणी ठिकाणच्या मागील बाजूस मार्केट यार्ड गेट समोरील रस्त्यावर साबळे ॲटोमोबाइल्स ते शिवशंकर बंगला, ३. मतमोजणी ठिकाणची उजवी बाजु व्हीआयपी रोड तसेच बेंद्रेकर एसटी डी रस्ता ते भीमरत्न वार्ताफलक कसबेसदन पर्यंतचा रस्ता या चर्तुसीमेमधील अंतर्गत भाग (झशवर्शीीळरप नेपश) केवळ पादचारी साठी घोषीत करण्यात आलेला आहे. तसेच उपविभागीय दंडाधिकारी पंढरपुर विभाग पंढरपुर यांनी भारतीय नागरीक सुरक्षा संहीता २०२३ चे क. १६३ नुसार शासकीय धान्य गोदाम पंढरपुर येथील परिसरात तसेच गोदाम भोवतीच्या सर्व रस्त्यांवर निवडणुक कामा व्यतिरीक्त अनावश्यकपणे थांबणे, वाहतुकीस अडथळा निर्माण करणे, खाजगी वाहने थांबवणे, या परिसरा मध्ये वादय वाजवणे, गोंगाट निर्माण करणे, घोषणा बाजी करणे, गर्दि अथवा जमाव करून कामकाजात अडथळा निर्माण करणे, शासकीय अधिकारी कर्मचारी यांचे कामकाजात अडथळा निर्माण करणे अथवा कामकाजापासुन परावृत्त करणे यास प्रतिबंध करण्यात आलेला आहे.

दि. २३/११/२०२४ रोजी मतमोजणी करीता उपस्थित राहणारे पोलींग एजंट हे वेळेवर ओळखपत्र घेवुन शासकीय गोडावुन येथे उपस्थीत राहतील. तसेच निकाल ऐकण्या करीता येणारे राजकीय पक्ष, अपक्ष नेतेमंडळी, कार्यकर्ते यांनी उपरोक्त तालुका दंडाधिकारी व उपविभागीय दंडाधिकारी, पंढरपुर यांनी लागु केलेल्या आदेशाचे अवलोकन करून आपआपली वाहने मार्केटयार्डच्या आतील बाजुस व श्रेयस पॅलेस, कराड रोड शेजारील गौतम विदयालया च्या जागेमध्ये रहदारीस अडथळा होणार नाही याची दक्षता घेवून पार्क करावीत. व कोठेही रस्त्यावर उभे न राहता रेल्वे ग्राउंड च्या आत उभे राहुन निकाल ऐकण्यास सहकार्य करावे असे आवाहन पोलीस निरीक्षक विश्वजीत घोडके यांनी केले आहे

# लोहा विधानसभा मतदारसंघात एकूण ७५.२० टक्के मतदान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

लोहा/प्रतिनिधी : ८८-लोहा विधानसभा मतदारसंघांमध्ये ३३८ मतदान केंद्रावर शांततेत मतदान पार पडले. मतदारांनी मतदान केंद्रावर सकाळी सात वाजेपासून लांबच लांब रांगा लावल्या होत्या.

यामध्ये दिव्यांग जेष्ठ नागरिकासोबत नव मतदारांनी मतदानासाठी उपस्थिती लावली.

८८, लोहा विधानसभा मतदारसंघांमध्ये एकूण ३ लक्ष १,६५० मतदारांपैकी २ लक्ष २६ हजार ८३७ मतदान झाले असून मतदारांनी ३३८ मतदान केंद्रावर जाऊन आपला मतदानाचा हक्क बजावला आहे .

यापैकी पुरुष मतदारांची संख्या १ लक्ष १७ हजार ६५१ आहे. तर महिला मतदारांची संख्या १ लक्ष ९ हजार १८३ इतकी असून इतर ०३ असे एकूण २लक्ष २६ हजार ८३७ मतदान लोहा विधानसभा मतदारसंघांमध्ये झाले आहे. त्याची टक्केवारी ७५%२० याप्रमणे आहे. २३नोव्हेंबरला मतमोजणी लोहा तहसील कार्यालयात महसूल हॉल या ठिकाणी होणार आहे.

कोण होणार भावी आमदार याची उत्सुकता उमेदवारासोबत - कार्यकर्ते व मतदारांना लागली आहे.

# विद्यार्थी, पालकांना सूचना, अद्यापही शिष्यवृत्ती अर्ज केला नसेल तर या विशेष मोहिमेचा लाभ घ्या

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नागपूर : शिष्यवृत्ती न मिळाल्याच्या विद्यार्थ्यांच्या अनेक तक्रारी असतात. यामुळे विद्यार्थ्यांना लाखो रुपयांचा भूर्दंडही बसत असतो. त्यामुळे विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ मिळावा यासाठी शासनाकडून विशेष मोहिम घेतली जाणार आहे. राज्याच्या उच्च शिक्षण संचालनालयामार्फत विद्यार्थ्यांसाठी महाडीबीटी पोर्टलच्या माध्यमातून १४ शिष्यवृत्ती योजना राबविल्या जातात. मात्र प्रवेशित विद्यार्थ्यांच्या तुलनेत शिष्यवृत्तीसाठी अतिशय कमी विद्यार्थ्यांनी ऑनलाइन पद्धतीने अर्ज भरले आहेत. त्यामुळे सर्व विद्यापीठ व महाविद्यालयांनी अधिकाधिक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती योजनेमध्ये सामावून घेण्यासाठी येत्या २५ ते ३० नोव्हेंबर या कालावधीत विशेष मोहीम राबवावी, अशा सूचना शिक्षण विभागातर्फे देण्यात आले आहेत. पुणे विभागीय शिक्षण सहसंचालक कार्यालयातर्फे शिष्यवृत्ती योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी परिपत्रक प्रसिद्ध करण्यात आले आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, डेक्कन कॉलेज, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, गोखले इन्स्टिट्यूट, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, एसएनडीटी विद्यापीठ, कवी कुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठ यासह विद्यापीठांशी संलग्न सर्व अनुदानित विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित संलग्न महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती अर्ज भरून घेण्यासाठी विशेष मोहीम राबवावे, असे आदेश देण्यात आले आहेत. उच्च शिक्षण विभागाच्या शिष्यवृत्ती योजनेसाठी प्रवेशित विद्यार्थ्यांच्या तुलनेत अतिशय कमी ऑनलाईन अर्ज महाडीबीटी




पोर्टलवर प्राप्त झाले आहेत,असे शिक्षण विभागातर्फे वेळोवेळी घेण्यात आलेल्या ऑनलाईन मीटिंग, प्रसिद्ध करण्यात आलेली परिपत्रके, तसेच वेळोवेळी देण्यात आलेल्या सूचनांमधून कळविण्यात आले आहे.

शिष्यवृत्ती योजनेसाठी अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येत वाढ व्हावी, या उद्देशाने महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांसाठी संगणक सुविधा, इंटरनेट सुविधा उपलब्ध करून द्यावी तसेच शिष्यवृत्ती अर्ज भरण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करावे. सर्व महाविद्यालय व संस्था आणि विद्यापीठ यांनी महाडीबीटी पोर्टलवर विशेष मोहीमे अंतर्गत राबविण्यात आलेल्या सप्ताहाच्या अनुषंगाने कार्यवाहीचा अहवाल उच्च शिक्षण सहसंचालक कार्यालयास सादर करावा, अशा सूचना पुणे विभागीय उच्च शिक्षण सहसंचालक यांनी दिल्या आहेत. त्यामुळे सर्व महाविद्यालयांना येत्या २५ नोव्हेंबर ते ३० नोव्हेंबर या कालावधीत विद्यार्थ्यांकडून शिष्यवृत्ती अर्ज भरून घेण्यासाठी विशेष सप्ताहाचे आयोजन करावे लागणार आहे.

महाडीबीटी पोर्टलवर लॉगीन करण्यासाठी सिलेक्ट युजरमध्ये जावून विद्यार्थी हा पर्याय निवडावा, युजर नेम व पासवर्ड टाकून लॉगइन करावे. लॉगइन झाल्यानंतर विंडोमध्ये योजना तपशील यावर क्लिक करा. त्यानंतर विभागावार योजना आपण पाहू व निवडू शकाल. त्यानंतर कोणत्या योजनासाठी (मॅट्रीकपूर्व / मॅट्रीकोत्तर) आपण पात्र आहात त्याची खात्री करा व पर्याय क्लिक करा (उदा. शालेय विद्यार्थ्यानी मॅट्रीकपूर्व व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी मॅट्रिकोत्तर हा पर्याय निवडावा). आवश्यक ती सर्व माहिती उदाहरणार्थ जात, प्रवर्ग, महाराष्ट्राचे रहिवासी, अपंगत्व, कौटुंबिक उत्पन्न इत्यादी माहिती सॉफ्टवेअरमध्ये काळजीपूर्वक भरावी. पालकांची माहिती, शाळा/महाविद्यालयाचा तपशील नमूद करावा. आवश्यक ती कागदपत्रे अपलोड करावीत (रहिवासी दाखला, उत्पन्न दाखला, एसएससी प्रमाणपत्र, जात प्रमाणपत्र, वैधता प्रमाणपत्र, बँक खाते क्रमांक, आधार क्रमांक इत्यादी). अभ्यासक्रमाचा तपशील, मागील परीक्षा उत्तीर्ण झाल्याचा तपशील इत्यादी सर्व माहिती अर्जदाराने भरावयाची आहे आणि सबमिशन पेजमधील सादर या बटनवर क्लिक करावयाचे आहे.

### ब्रेक-अप झाल्यास पुरुषावर बलात्काराचा गुन्हा दाखल होऊ शकत नाही, सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय

(पान १ वरून...) तक्रारकर्त्या महिलेने २०१९ मध्ये एक ऋख्ठ दाखल केली होती. ज्यामध्ये तिने हा आरोप केला होता की तिच्या प्रियकराने लग्नाचं वचन देऊन तिच्यावर बलात्कार केला, लैंगिक शोषण केलं. त्याने बळजबरीने शरीरसंबंध ठेवले. तसंच त्याने आपल्याला धमकी दिली होती की लैंगिक संबंध ठेवले नाहीस तर तुझ्या कुटुंबाला मी इजा पोहचवेन. तक्रारदार महिलेच्या या तक्रारीनंतर कलम ३७६ (२) आणि ५०६ अंतर्गत गुन्हा दाखल केला होता. मात्र हा गुन्हा रद्द व्हावा म्हणून याचिकाकर्त्याने अर्ज दाखल केला होता. त्यासाठी आधी दिल्ली उच्च न्यायालयात हे प्रकरण गेलं. उच्च न्यायालयाने याचिका फेटाळली त्यामुळे हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात गेलं. सर्वोच्च न्यायालयाने महिलेने केलेले आरोप तथ्यहीन आहेत असं म्हटलं आहे.

तसंच न्यायालयाने तक्रारदार महिलेला हा प्रश्नही विचारला की जर याचिकाकर्ता बलात्कार करत होता, लैंगिक शोषण करत होता तरीही तू त्याला का भेटत होतीस? दोघंही सज्ञान असल्याने त्यांच्यात सहमतीने शरीर संबंध प्रस्थापित झाले. लग्नाचं वचन देऊन हे सगळं सुरु झालं याचा कुठलाही संकेत आढळला नाही. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणात लैंगिक शोषण किंवा बलात्काराचा गुन्हा नोंदवता येणार नाही असं म्हटलं आहे. लाईव्ह लॉ ने हे वृत्त दिलं आहे.

**ह.भ.प. किरण बोधले महाराज यांच्या हस्ते संपन्न**

**१२.१० लाख मेट्रिक टन ऊस गाळपाचे उद्दिष्ट**

# श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचा ४३ वा गळीत हंगाम शुभारंभ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी, राजेंद्र कोरके पाटील : श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचा सन २०२४/२५ गळीत हंगाम ४३ वा गळीत हंगाम शुभारंभ बुधवार दिनांक २१ नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी ११ वाजता या शुभ या समयी ह.भ.प. श्री किरण बोधले महाराज व श्री संत मानखुजी महाराजांची वंशज श्री क्षेत्र पंढरपूर यांचे शुभहस्ते व डीएपी उद्योग समूहाचे कार्यकारी संचालक मा. श्री. अमोल पाटील वरी कॉलेज संस्थापक सचिव डॉक्टर बीपी रोंगे सर कारखान्याच्या व्हाईस चेअरमन सौ. प्रेम लताताई रोंगे मॅडम यांच्या उपस्थितीत कारखाना कार्यस्थळावर संपन्न झाला.

सदर कार्यक्रम प्रसंगी कारखान्याचे कार्यकारी संचालक श्री रवींद्र पाटील हे प्रास्ताविका भाषणात




बोलताना म्हणाले की या गळीत हंगाम कारखान्याने ४०,१४५ एकर उसाची नोंद झालेली असून त्यामधून १२.१० लाख मेट्रिक टन ऊसाची गाळप होईल ऊस उत्पादक सभासद व शेतकरी यांच्या ऊसाची वेळेत गाळप होण्यासाठी कारखान्याची कारखान्याने यावर्षी पुरेशी ऊस तोडणी वाहतूक यंत्रणा उभी केलेली आहे.

सदर प्रसंगी बोलताना कारखान्याचे संचालक श्री तुकाराम मस्के सर म्हणाले की, आपल्या कारखान्यास कैलासवासी आंदोलनाना पाटील यांना अभिप्रेत असलेली चेअरमन मिळालेले असल्यामुळे अभिजीत आबा पाटील यांच्या नेतृत्वात या कारखान्यास गतवैभव प्राप्त होईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला याप्रसंगी हभप किरण महाराज बोधले महाराज हे आपल्या आपल्या माध्यमिक शैलीमध्ये विचार व्यक्त करताना म्हणाले की विठ्ठल कारखाना ही ही फार मोठी आध्यात्मिक शक्ती आहे विठ्ठल कारखान्याला अधिक सातू साधू संतांचे आशीर्वाद लाभले आहेत.

श्री विठ्ठल सहकारी साखर आणि चेअरमन अभिजीत पाटील हे जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी कटिबद्ध आहेत त्यामुळेच कारखान्याचे सर्वसामान्य जनतेचे प्रश्न सोडवता आहे त्यामुळे कारखाना हा प्रगतीपथावर आहे असे त्यांनी आपले मत व्यक्त केले आहे.

कारखाना निश्चित प्रगतीपथावर राहील असे म्हणाले व पुढील गणित हंगाम यशस्वी होण्यासाठी शुभेच्छा दिल्या.

सदर कार्यक्रम प्रसंगी बोलताना चोरी क्वालिटी संस्थापक सचिव डॉक्टर बीपी रोंगे सर मनाली की कारखान्याची चेअरमन मा अभि दाबा पाटील यांच्या नेतृत्वात गेली दोन गलिधंगाम उत्कृष्टपणे चालवली असून उच्चांकी दर दिलेला आहे या कारखान्याच्या स्थापित गणित हंगामाचा पुरेपूर वापर करून जास्तीत जास्त गाळप करण्याचा संचालक मंडळाचा मानस असल्याचेही त्यांनी सांगितले व या गळीत हंगाम ही यशस्वीपणे पार पाडण्यासाठी सभासद व ऊस उत्पादक शेतकरी यांनी आपला संपूर्ण ऊस आपले श्री विठ्ठल सहकारी कारखान्यात द्यावा असे आव्हान त्यांनी केले.

सदर कार्यक्रम प्रसंगी कारखाने संचालक सर्व श्री संभाजी भोसले कालिदास पाटील दिनकर (दाजी) चव्हाण, सुरेश भुसे, बाळासाहेब हाके, धनंजय काळे, साहेबराव नागणे, कालिदास साळुंखे, सचिन वाघाटे, जनक भोसले, प्रवीण कोळेकर, नवनाथ नाईक नवरे, दत्तात्रय नरसाळे, सिताराम गवळी, अशोक जाधव, सिद्धेश्वर बंडगर श्रीमती कलावती महादेव खटके, सौ सविता विठ्ठल रणदिवे, तज्ञ संचालक श्री दशरथ जाधव, अशोक तोंडले, तज्ञ संचालक, तानाजी बागल, उमेश मोरे, आनंद चिखलीकर, अशोक घाडगे, गणेश ननवरे, समाधान गाजरे, कारखान्याची जनरल मॅनेजर गायकवाड तसेच कर्मचारी व सुभाष शेतकरी व्यापारी अधिकारी व कारखान्याचे सर्व सभासद ही अत्यंत उपस्थित होते.

दैनिक
यश सिद्धि न्यूज



## थोडक्यात...

### १२५ कोटीच्या संशयित व्यवहारांप्रकरणी एकाला अटक

मुंबई : मालेगाव बँकेतील १२५ कोटी रुपयांच्या संशयास्पद व्यवहारांप्रकरणी सक्तवसुली संचलनालयाने अहमदाबाद विमानतळावरून अक्रम मोहम्मद शफीला अटक केली. त्याच्याविरोधात लुक आऊट सर्कुलर जारी करण्यात आले होते. तो दुबईला जाण्याचा प्रयत्न करत असताना इमिग्रेशन अधिकाऱ्यांनी त्याला ताब्यात घेतले. मालेगाव येथील सिराज अहमदने दोन बँकांमध्ये १४ खाती उघडून त्यातील रकमेचा निवडणुकीसाठी कथित गैरवापर केल्याच्या आरोप आहे. याप्रकरणी ईडीने गेल्या आठवड्या ठाणे, वाशी, मालेगाव, नाशिक, सूरत आणि अहमदाबादमध्ये व्यापारी आणि बनावट कंपन्यांशी संबंधित २४ ठिकाणी छापे टाकले होते. गेल्या सहा महिन्यांपासून मालेगावमधील १४ बँक खात्यांमध्ये सुमारे १२५ कोटी रुपये जमा झाले असून त्यातील रक्कम अहमदाबाद येथील १० बँक खात्यांवर हस्तांतरित झाली आहे. अहमदाबाद येथील १० बँक खात्यांमध्ये २०० कोटी रुपयांचे व्यवहार झाल्याचे अधिकाऱ्याने सांगितले. बँक खात्यातून ही रक्कम काढण्यात आली आहे.

# सोलापूर जिल्ह्यात सरासरी ६७.७२ टक्के मतदान

## जिल्ह्यात एकूण ३८ लाख ४८ हजार ८६९ मतदारांपैकी २६ लाख ६ हजार ५७१ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर, दिनांक २१ (जिमाका):- भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार २० नोव्हेंबर २०२४ रोजी सोलापूर जिल्ह्यासह राज्यातील सर्व विधानसभा मतदारसंघात आज मतदान घेण्यात आले. जिल्ह्यातील अकरा विधानसभा मतदारसंघात सरासरी एकूण ६७.७२ टक्के मतदान झालेले आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिली. जिल्ह्यात एकूण ३८ लाख ४८ हजार ८६९ मतदार असून २६ लाख ६ हजार ५७१ मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावलेला आहे. यामध्ये पुरुष मतदार १३ लाख ६६ हजार ५८८, स्त्री मतदार १२ लाख ३९ हजार ८६८ तर तृतीयपंथी ११५ मतदाराने मतदान केलेले आहे. मतदानाची एकूण सरासरी ६७.७२ % झालेली आहे.

विधानसभा निहाय झालेले एकूण मतदान व मतदानाची टक्केवारी खालील प्रमाणे -

२४४ करमाळा विधानसभा मतदारसंघात एकूण २ लाख २९ हजार ३७५ मतदारांनी मतदान केले (६९.७२%).

२४५ माढा विधानसभा मतदारसंघात एकूण २ लाख ६७ हजार ६९१ मतदारांनी मतदान केले असून ७५.९०% टक्के मतदान झाले.

२४६ बार्शी विधानसभा मतदारसंघात २ लाख ४६ हजार ७१२ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला मतदानाची टक्केवारी ७३.१०%.

२४७ मोहोळ अनुसूचित जाती



विधानसभा मतदारसंघात २ लाख ३० हजार ८५० मतदारांनी मतदान केले असून मतदानाची टक्केवारी ६९.६५% आहे.

२४८ सोलापूर उत्तर विधानसभा मतदारसंघात एकूण १ लाख ९१ हजार ३९४ मतदारांनी मतदान केले असून ५८.२५ टक्के मतदान झालेले आहे.

२४९ सोलापूर मध्य विधानसभा मतदारसंघात एकूण २ लाख २९१ मतदारांनी मतदान केले असून मतदानाची सरासरी ५७.७७% आहे.

२५० अक्कलकोट विधानसभा मतदारसंघात एकूण २ लाख ५५ हजार २६ मतदारांनी मतदान केले असून टक्केवारी ६६.५०% आहे.

२५१ सोलापूर दक्षिण विधानसभा मतदारसंघात एकूण २ लाख २३ हजार ६२४ मतदारांनी मतदान केले असून मतदानाची टक्केवारी ५८.४२ टक्के आहे.

२५२ पंढरपूर विधानसभा मतदारसंघात एकूण २ लाख ५९ हजार ७४४ मतदारांनी मतदान केलेले आहे. मतदानाची टक्केवारी ६९.५१.

२५३ सांगोला विधानसभा मतदारसंघात एकूण २ लाख ६१ हजार १३ मतदारांनी मतदान केले असून मतदानाची टक्केवारी ७८.२७ % आहे.

२५४ माळशिरस अनुसूचित जाती मतदार संघात एकूण २ लाख ४० हजार ८५१ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला असून मतदानाची सरासरी टक्केवारी ६८.९०% आहे.

# सोलापूर जिल्हा क्रीडा विभागातर्फे जिल्हास्तर युवा महोत्सवाचे आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (जिमाका) : क्रीडा व युव सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय सोलापूर व जिल्हा क्रीडा परिषद सोलापूर व्दारा आयोजित जिल्हास्तर युवा महोत्सव दिनांक २९ नोव्हेबर ते ०२ डिसेंबर २०२४ या कालावधीत करण्यात येणार आहे. युवकांचा सर्वागीण विकास करणे, संस्कृती व परंपरा जतन करणे युवकांच्या अंगी असलेल्या सुप्त गुणांना वाव देणे व राष्ट्रीय एकात्मता जपणे व वाढीस लागणे यासाठी प्रती वर्षी राष्ट्रीय युवा महोत्सवाचे युवा कार्यक्रम व खेळ मंत्रालय भारत सरकार व्दारा आयोजन करण्यात येते राज्यात सन २०२४-२५ जिल्हास्तरापासून राष्ट्रीय स्तरा पर्यंत युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

युवकांचा सर्वागीण विकास करणे, संस्कृती व परंपरा जतन करणे, युवकांच्या अंगी असलेल्या सुप्तगुणांना वाव देणे व राष्ट्रीय एकात्मता लागणे यासाठी प्रतिवर्षी जिल्हास्तर, विभागस्तर, राज्यस्तर व राष्ट्रीय स्तरावर युवा महोत्सवाचे आयोजन क्रीडा विभागातर्फे करण्यात येत आहे. राष्ट्रीय युवा महोत्सवाचे आयोजन १२ ते १६ जानेवारी २०२५ या कालावधीत होणार आहे. २०२४-२५२ या वर्षात जिल्हास्तरीय युवा महोत्सवाचे आयोजन हे विज्ञान व तंत्रज्ञान या नवसंकल्पनावर आयोजित आहे.

राष्ट्रीय युवा महोतसवात महाराष्ट्र राज्यासाठी विज्ञान व तंत्रज्ञान या संकल्पनेवर आधारित जिल्हास्तरीय युवा महोत्सवाचे आयोजन जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय मार्फत होणार आहे. युवा महोत्सवामध्ये विज्ञान व तंत्रज्ञान, लोकगीत, लोकनृत्य, कौशल्य विकास स्पर्धा, कथालेखन, चित्रकला, वक्तृत्व स्पर्धा, कविता, हस्तकला, वस्त्रोद्योग, अशा विविध स्पर्धाचा समावेश आहे.

युवा महोत्सवात १५ ते १९ वयोगटातील युवक व युवती सहभागी होऊ शकतील स्पर्धेमध्ये प्राविण्यप्राप्त खेळाडूंना शासनाव्दारे विविध पारितोषिक तसेच प्रमाणपत्र देण्यात येईल. जिल्हास्तर युवा महोत्सवामध्ये प्रथम क्रमांक प्राप्त करणा-या युवक व युवती यांची विभागस्तरावर निवड करण्यात येते व विभागस्तरावर प्राविण्य प्राप्त युवक युवती यांची निवड राज्यस्तरीय युवा महोत्सवाकरिता करण्यात येते व पुढे राष्ट्रीय युवा महोत्सवाकरिता प्राविण्यप्राप्त युवक व युवती यांची निवड केली जाते.

जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय सोलापूर तर्फे आयोजित होणा-या जिल्हास्तरीय युवा महोत्सवाचे आयोजन हे विज्ञान व तंत्रज्ञान यामधील नवसंकल्पना यावर आयोजित करावयाचे आहे. यामध्ये सोलापूर जिल्हयाचे संगीत महाविदयालय, वरिष्ठ व कनिष्ठ महाविदयालय, समाजकार्य महाविदयालय, इंजिनिअरिंग महाविदयालय, वैदयकीय महाविदयालय, कृषी महाविदयालय, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, शाळा, महाविदयालय, शैक्षणिक संस्था इत्यादीनी (दि.१२ जानेवारी २०२५ या दिनांका रोजी वयाची परिगणना १५ ते २९ असावी) १५ ते २९ वर्षे वयोगटातील युवक व युवती यांनी जिल्हास्तरीय युवा महोत्सवामध्ये जास्तीत जास्त स्पर्धेकांनी सहभाग घ्यावा. सोलापूर जिल्हास्तरीय युवा महोत्सवामध्ये सहभागी होणा-या संस्था, मंडळ, वैयक्तिक, युवक व युवती यांनी आपले प्रवेश अर्ज दिनांक २७ नोंव्हेबर २०२४ पर्यत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय कुमठा नाका सोलापूर येथे कार्यालयीन वेळेत सादर करावेत. विहीत मुदतीनंतर आलेल्या प्रवेशअर्जाचा विचार करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी अधिक माहितीकरिता श्री. गणेश पवार राज्य क्रीडा मार्गदर्शक ९९७००९५३१५ यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी नरेंद्र पवार यांनी केले आहे.

### मालवण येथील शिवपुतळा दुर्घटना

# बांधकाम सल्लागार चेतन पाटील यांना उच्च न्यायालयाकडून जामीन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : मालवण शिवपुतळा दुर्घटनाप्रकरणी पुतळ्याचे बांधकाम सल्लागार डॉ. चेतन पाटील यांच्याविरोधात खटला चालवला जावा असे कोणतेही कारण किंवा पुरावे आढळून येत नाही, असे नमूद करून उच्च न्यायालयाने गुरूवारी त्यांना जामीन मंजूर केला. दुसरीकडे, या प्रकरणातील मुख्य आरोपी आणि शिवपुतळ्याचा शिल्पकार जयदीप आपटे याच्या जामीन अर्जावरी मात्र न्यायालय २५ नोव्हेंबर रोजी तपशीलवार सुनावणी घेणार आहे.

पाटील यांची पुतळ्याचे बांधकाम अभियंता म्हणून नियुक्ती करण्यात आली नव्हती किंवा त्यांना अहवाल सादर करण्यास सांगण्यात आले नव्हते. पाटील यांनी केवळ पुतळ्याचा पाया स्थिर आणि मजबूत आहे की नाही याचा अहवाल सादर केला होता. पुतळ्याच्या पडझडीनंतरही त्याचा पाया शाबूत होता, असे निरीक्षणही न्यायमूर्ती अनिल किलोर यांच्या एकलपीठाने पाटील यांना जामीन देताना प्रामुख्याने नमूद केले. घटनास्थळाच्या पाहणीशी संबंधित संयुक्त तपासणी समितीचा एक गोपनीय अहवाल सुनावणीच्या वेळी सरकारी वकिलांनी न्यायालयात सादर केला. त्यातही पुतळ्याचा पाया मजबूत असल्याचे, त्यात काही दोष नसल्याचे नमूद करण्यात आल्याचे म्हटले होते.

तत्पूर्वी, सिंधुदर्ग सत्र न्यायालयाने जामीन अर्ज फेटाळल्यानंतर आपटे आणि पाटील या दोघांनीही जामिनसाठी उच्च न्यायालयात धाव घेतली होती. मागील आठवड्यात या प्रकरणी सुनावणी झाली. त्यावेळी दोन्ही आरोपींविरोधात आरोपपत्र दाखल झाल्याने दोघांनी जामिनासाठी कनिष्ठ न्यायालयात दाद मागावी, असा युक्तिवाद सरकारतर्फे करण्यात आला होता. परंतु, दोन्ही आरोपींना जामिनासाठी कनिष्ठ न्यायालयात जाण्याची आवश्यकता नाही. त्यांच्या याचिकांवर येथेच सुनावणी होईल, असे न्यायालयाने स्पष्ट केले होते. त्यानुसार, पाटील यांच्या याचिकेवर निर्णय देताना आपटे याच्या याचिकेवर न्यायालयाने २५ नोव्हेंबर रोजी सुनावणी ठेवली आहे.

दरम्यान, सोसाट्याच्या वाऱ्यामुळे मालवणमधील राजकोट किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांचा कांस्य पुतळा कोसळल्याचा दावा आपटेने जामिनाची मागणी करताना केला आहे. यापूर्वी, आपण नौदलासाठी कांस्य पुतळ्यांचे काम केले आहे. परंतु, नौदलाकडून आपल्या कामाबाबत कधीच तक्रार केली नाही. याउलट, धातू शास्त्रांतील तांत्रिक कौशल्याबाबत काहीच माहीत नसलेल्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या (पीडब्ल्यूडी) अधिकाऱ्यांनी दुर्घटनेच्या नऊ तासांमध्येच तक्रार नोंदवल्याचा दावा आपटेने याचिकेत केला आहे. शिवाय, पुतळा कोसळल्यामुळे कोणीही जखमी झाल्याचे तक्रारीत नमूद नाही. त्यामुळे, हे प्रकरण निष्काळजीपणाचे असू शकते, असा दावाही आपटे याने याचिकेत केला आहे. हा पुतळा अनेक शतके टिकेल आणि सुस्थितीत राहील हे लक्षात घेऊन खबरदारीचे सर्व उपाय केल्याचा दावा देखील आपटे यांनी केला आहे.

# निकालाआधीच घडामोडींना वेग; 'मविआ'ची मुंबईत बैठक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : विधानसभेच्या निवडणुकीचं मतदान २० नोव्हेंबर रोजी झालं. आता निवडणुकीचा निकाल २३ नोव्हेंबर रोजी जाहीर होणार आहे. त्यामुळे या निकालाकडे अवघ्या देशाचं लक्ष लागलं आहे. महाराष्ट्रात कोणत्या पक्षाचं सरकार येणार? महाविकास आघाडी की महायुतीचं सरकार येणार? याबाबत राजकीय नेत्यांकडून वेगवेगळे दावे करण्यात येत आहेत. विधानसभा निवडणुकीचे एक्झिट पोलचे अंदाज समोर आले आहेत. त्यामध्ये काही एक्झिट पोलच्या अंदाजानुसार महायुतीला जास्त जागा मिळण्याची शक्यता आहे, तर महाविकास आघाडीला कमी जागा मिळण्याचा अंदाज आहे. मात्र, असं असलं तरी निकाल समोर आल्यानंतरच कोणाला किती जागा मिळतात? हे स्पष्ट होईल.

दरम्यान, विधानसभा निवडणुकीच्या निकालाला एक दिवस बाकी असतानाच मुंबईत मोठ्या घडामोडी वाढल्या असल्याचं पाहायला मिळत आहे. आज सायंकाळी शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत, काँग्रसचे नेते बाळासाहेब थोरात, काँग्रसचे नेते सतेज पाटील आणि राष्ट्रवादी काँग्रस (शरद पवार) पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांची मुंबईतील ग्रँड हयात हॉटेलमध्ये महत्वाची बैठक पार पडली. या बैठकीत निकालानंतर किती जागा येतात? आणि त्यानंतरची पुढील रणनीती काय असेल? याबाबत चर्चा झाल्याची माहिती सांगितली जात आहे. एवढंच नाही तर या बैठकीनंतर जयंत पाटील, बाळासाहेब थोरात आणि संजय राऊत यांनी मातोश्रीवर उद्धव ठाकरे यांच्याबरोबरही चर्चा केली. त्यामुळे मुंबईत नेमकं काय घडतंय? याकडे अनेकांच्या नजरा लागलेल्या आहेत. यासंदर्भात बाळासाहेब थोरात यांनी बैठकीनंतर माध्यमांशी संवाद साधत महाविकास आघाडीचं सरकार नक्कीच येईल, असा दावा करत महायुतीचं सरकार सत्तेवरून घालवण्याला आम्ही पहिलं प्रधान्य देत असल्याचं त्यांनी म्हटलं आहे.



आमच्या बैठकीत एकच चर्चा झाली. आम्ही २८८ जागाचा आढावा घेतला. तेव्हा आमच्या लक्षात आलं की महाविकास आघाडीचं सरकार बनेल. महाविकास आघाडीचं सरकार नक्कीच येईल, आम्हाला कोणतीही अडचण येणार नाही. असं चित्र आम्हाला स्पष्टपणे दिसत आहे. आम्हाला बहुमतापेक्षा कमी जागा येतील असं वाटत नाही. आम्हाला जुळवाजुळवीची गरज पडेल असंही वाटत नाही. त्यानंतर आमच्याबरोबर कणी आलं तर आनंदच मानतो. आता आधी निवडणूक झालेली आहे. मग निकाल समोर येईल. मग सरकार बनवताना आम्ही मुख्यमंत्रिपदाबाबत चर्चा करू. महायुतीचं सरकार सत्तेवरून घालवणं याला पहिलं प्रधान्य आम्ही देतो, असं बाळासाहेब थोरात यांनी म्हटलं आहे.

कोणत्याही अपक्षांबरोबर अद्याप चर्चा झालेली नाही. मात्र, नंतर ज्यांना आमच्याबरोबर यायचं ते येतील. निकालानंतर आमचा आकडा समोर आला की आम्ही राज्यपालांना त्याबाबतचं पत्र देऊ. नाना पटोले उद्या चर्चेसाठी येत आहेत. तसेच आमचे नेते रमेश चेन्निथला हे देखील येत आहेत. आज झालेल्या चर्चेचा आढावाही आम्ही दिल्लीला देणार आहोत. काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे आमच्या संपर्कात आहेत. ते देखील सतत आढावा घेत आहेत. आमचा कोणीही आमदार फुटणार नाही. त्यामुळे ती काळजी आम्हाला नाही. आमचा आकडा चांगला आल्यानंतर आम्ही सत्तास्थापनेचा दावा करणार आणि सरकार बनवणार. आज आमच्या झालेल्या बैठकीत एक ठरलं आहे की, मतमोजणीच्यावेळी शेवटचं मत मोजून झाल्यानंतर प्रमाणपत्र घेतल्यानंतर बाहेर पडायचं. त्याआधी आमच्या कोणत्याही कार्यकर्त्यांनी बाहेर यायचं नाही, असं बाळासाहेब थोरात यांनी म्हटलं आहे.

दरम्यान, निकालाच्या पार्श्वभूमीवर आज महाविकास आघाडीच्या नेत्यांची मुंबईत महत्वाची बैठक पार पडली. या बैठकीला काँग्रसचे नेते बाळासाहेब थोरात, काँग्रसचे नेते सतेज पाटील उपस्थित होते. मात्र, या बैठकीला नाना पटोले उपस्थित नसल्याने उलटसुलट चर्चा राजकीय वर्तुळात रंगल्या आहेत. आज सकाळीच नाना पटोले यांच्याबाबत ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी मुख्यमंत्रिपदावरून खोचक टीका केली होती. त्यानंतर आजच्या बैठकीला नाना पटोलेंनी दांडी मारल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत.

### कलम १६३ भारतीय नागरिक सुरक्षा संहिता

### पोलिस आयुक्त एम. राजकुमार

# मतमोजणी कालावधीत विविध साहित्य, शस्त्र, वाहन व व्यक्तींच्या प्रवेशावर निर्बंध

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (जिमाका) : दिनांक १५ ऑक्टोबर २०२४ रोजी मा. भारत निवडणूक आयोगाने विधानसभा सार्वत्रिक निवडणूक- २०२४ साठी कार्यक्रम घोषीत केला आहे. सदर दिनांकापासून आदर्श आचार संहिता अंमलात आलेली आहे.

दिनांक २३ नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी ०८.०० वा. पासून तीनही विधानसभा मतदार संघाची मतमोजणी खाली नमुद ठिकाणी सुरु होणार आहे. त्यानुसार मतमोजणी प्रक्रिया शांततेत, न्याय वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीकोनातून मतमोजणीचा संपूर्ण परिसर व त्या लगतचे १०० मीटर परिसरात विविध साहित्य, शस्त्र बाळगण्यास, वाहनांचे आणि व्यक्तींच्या प्रवेशास प्रतिबंध घालण्यात येत आहे.

२४८ सोलापूर शहर उत्तर विधानसभा मतदार संघ -मतमोजणीचे ठिकाण -एन.बी. नवले, सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, केगांव, सोलापूर

२४९ सोलापूर शहर मध्य विधानसभा मतदार संघ- मतमोजणीचे ठिकाण -नुतन मराठी विद्यालय, हरीभाई देवकरण प्रशालाजवळ, होम मैदान समोर, डफरीन चौक, सोलापूर

२५१ दक्षिण सोलापूर विधानसभा मतदार संघ- मतमोजणीचे ठिकाण -बहुउद्देशीय सभागृह, राज्य राखीव पोलीस बल गट क्रं.१०, सोरेगांव, सोलापूर

पोलीस आयुक्त, सोलापूर शहर एम. राज कुमार, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम १६३ नुसार प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करुन, वर नमुद प्रमाणे तीनही विधानसभा मतदार संघाचे मतमोजणी ठिकाणाचे परिसर व त्या लगतचे १०० मिटर परिसरात खालील कृती करण्यास निर्बंध घालण्यात येत आहे.

वर नमुद तीनही विधानसभा मतदार संघाचे मतमोजणी इमारतीचे आतील संपूर्ण परिसरात मोबाईल, टॅब्लेट, संगणक व तत्सम संदेशाची देवाण-घेवाण करणारी विद्युत उपकरणे आणण्यास / वापरण्यास / हाताळण्यास प्रतिबंध असेल.

वर नमुद तीनही विधानसभा मतदार संघाचे मतमोजणी इमारतीमध्ये तंबाखुजन्य पदार्थ, आगपेटी, लायटर, ज्वालाग्रही पदार्थ अथवा कोणतेही घातक पदार्थ किंवा वस्तु घेवुन प्रवेश करणे.

वर नमुद तीनही विधानसभा मतदार संघाचे मतमोजणी केंद्राचे परिसरात निवडणूक विषयक अधिकारी / कर्मचारी, उमेदवार, उमेदवारांचे मतमोजणी प्रतिनिधी आणि निवडणूक कार्यालयाकडून दिलेल्या ओळखपत्रधारक व्यक्ती यांचेशिवाय इतर व्यक्ती यांनी मतमोजणी केंद्राचे परिसरात प्रवेश करणे.

कोणत्याही प्रकारचे शस्त्र बाळगुन वर नमुद तीनही विधानसभा मतदार संघाचे मतमोजणी केंद्राचे परिसरात प्रवेश करणे.

सोलापूर जिल्हा निवडणूक कार्यालय अथवा संबंधीत विधानसभा मतदार संघाचे निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयाकडुन दिलेल्या वाहन परवानाशिवाय इतर वाहनांनी मतमोजणी केंद्रात प्रवेश करणे.

पत्रकार व माध्यम प्रतिनिधी यांनी प्रत्यक्ष मतमोजणी कक्षामध्ये मोबाईल व कॅमेरासह प्रवेश करणे,

सदर बंदी आदेश निवडणुक प्रक्रियेशी संबंधित अधिकारी कर्मचारीवृंद ,बंदोबस्तकामी तैनात असलेले सर्व पोलीस अधिकारी, अंमलदार , राज्य व केंद्रीय सुरक्षा दलाचे जवान यांना लागू असणार नाही.

या आदेशाचा भंग करणारी व्यक्ती भारतीय न्याय संहिता,२०२३ चे कलम २२३ प्रमाणे शिक्षेस पात्र होईल, हा बंदी आदेश दि २३ नोव्हेंबर २०२४ रोजी ५ वा. पासुन मतमोजणीची संपूर्ण प्रक्रिया संपेपर्यंत अंमलात राहिल असे आदेश पोलीस आयुक्त सोलापूर शहर एम. राज कुमार यांनी दिले आहेत.